पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
पत्ता : चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३

जा.क्र. /पोउआ / वाहतूक /४८३५३५/२०२३ पिंपरी - चिंचवड दिनांक- ०६/११/२०२३

# प्रे स नो ट

**विश्वचषक क्रिकेट स्पर्धा-२०२३ अंतर्गत दिनांक ०८/११/२०२३ व दिनांक ११/११/२०२०३ रोजी इंग्लंड विरुद्ध नेदरलँड व ऑस्ट्रेलिया विरुद्ध बांग्लादेश सामन्याचे दिवशी प्रेक्षकांचे वाहनांना पार्किंगचे ठिकाणी जाणेचा मार्गाबाबत.**

-----oo-----

विश्वचषक क्रिकेट स्पर्धा-२०२३ अंतर्गत दिनांक ०८/११/२०२३ व दिनांक ११/११/२०२०३ रोजी इंग्लंड विरुद्ध नेदरलँड व ऑस्ट्रेलिया विरुद्ध बांग्लादेश सामना पाहण्यासाठी येणाऱ्या प्रेक्षकांच्या चारचाकी व दुचाकी वाहनांचे पार्किग व्यवस्था व मार्ग खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

**१) मुंबईर्कडून येणा-या प्रेक्षकांच्या वाहनांसाठी मार्ग खालील प्रमाणे**

अ) द्रुतगती मार्गाचे देहुरोड एक्झीट मधून डावीकडे वळावे त्यानंतर तात्काळ परत डावीकडून वळून एक्सप्रेस हायवे लगतच्या मामुर्डीगावाचे बाजुस असलेल्या सर्विस रोडने स्टडीयमकडे व पार्किंगकडे जाण्याच्या मार्गाचा अवलंब करावा.

ब) द्रुतगती मार्गावरुन येणारी वाहाने किवळे ब्रिज वरुन मुकाई चौक येथुन यु टर्न घेऊन कृष्णा चौक मार्ग एक्सप्रेस लगतच्या सिबॉसेस कॉलेच्या बाजुकाडील असलेल्या सर्विस रोडने स्टडीयमकडे व पार्किंगकडे जाण्याच्या मार्गाचा अवलंब करावा.

क) जुना मुंबई पुणे हायवे प्रेक्षकांची वाहने सोमाटणे फाटा, सेंट्रल चौक मार्गे बंगलोर हायवे वरील मामुर्डी जकात नाका जवळील अडंरपास व रस्ताने येणारे प्रेक्षकाच्या वाहनांना शितलादेवी मंदीर येथून मामुर्डी गावात येण्यास बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- सदर मार्गावरील वाहने शितलादेवी मंदीर येथुन डाव्या बाजुस वळवून लेखा फार्म मार्गे असलेल्या सर्विस रोडने स्टडीयमकडे व पार्किंगकडे जाण्याच्या मार्गाचा अवलंब करावा.

**२) पुणे बाजुकडून येणा-या प्रेक्षाकाच्या वाहनांसाठी मार्ग खालील प्रमाणे**

अ) पुणे बंगलोर हॉयवेवरुन पवनानदी ब्रिज, हॉटेल सॅन्टोंसा पास करुन किवळे ब्रिज वरुन वाहने सावकाश डाव्या बाजुकडे वळवावी व २०० मिटर वरुन दुतगती मार्गाचे डाव्या बाजुचे असलेल्या सर्विस रोडने स्टडीयमकडे व पार्किंगकडे जाण्याच्या मार्गाचा अवलंब करावा.

ब) निगडी, हॅगींग ब्रिज कडून येणारे प्रेक्षकांची वाहने रावेत चौक, भोंडवे चौक, मुकाई चौक मार्ग कृष्णा चौक येथुन उजव्या बाजुस वळुन परत एक्सप्रेस हायवे पासून डाव्या बाजुस वळुन असलेल्या सर्विस रोडने स्टडीयमकडे व पार्किंगकडे जाण्याच्या मार्गाचा अवलंब करावा.

३) एम सी ए स्टडीयमकडून साईनाथनगर मार्गे येणारा जुना मुंबई पुणे महामार्गाकडे येणारा रस्ता हा एकतर्फी फक्त जाण्यासाठी वापरण्यात येत आहे. साईनाथनगर मार्गे स्टेडीयमकडे येण्यासाठी प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

टिप :१) सेंट्रल चौक - साईनगर मार्गे कानेटकर बंगला चौककडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनास बंदी असेल.

२) मैदानाकडे प्रेक्षक येताना व सामना संपल्यावर परत जाताना त्याचे विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांना मज्जाव असेल.

(बापू बांगर)
**पोलीस उप-आयुक्त,**
**वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड**

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

Scanned with OKEN Scanner